REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख २५ डिसेंबर १९४६ अंक ५०

## दि डेक्कन ॲग्रिकल्चर ॲन्ड डेअरी फार्मिंग लिमिटेड, पुणें.

रजिस्टर्ड ऑफिसः—११६ अ, शुक्रवार पेठ, पुणें २

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

रा. रा. आर्. जे. सावंत, शेअर ॲन्ड स्टॉक ब्रोकर्स, चेअरमन

रा. रा. एन्. जी. पवार, बी. ए., बी. ई., इंजिनिअर ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर

रा. रा. एम्. पी. नानल, वैद्य ( आयुर्वेद विद्याविशारद )

रा. रा. सरदार एन्. जी. विंचूरकर, बी. ए., एम. एल. ए. ( सेंट्रल ), सी. बी. ई.

रा. रा. बी. एन्. सणस, प्रेसिडेंट, पुना सिटी म्युनिसिपालिटी

## : कंपनीचे शेअर्सची विक्री चालू आहे :

चौकशी खालील ठिकाणीं करावीः—

हेड ऑफिस—११६ अ, शुक्रवार पेठ, पुणें २

बँकर्स—दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. पुणें २

शेअर ब्रोकर्स—मे. आर. जे. सावंत, ६२ स्टॉक एक्स्चेंज न्यू बिल्डिंग, अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई

**पी. के. अँड कं.**

मॅनेजिंग एजन्ट्स

# विविध माहिती

**रेडिओचे परवाने**—ऑक्टोबर १९४५ मध्ये ब्रिटिश हिंदुस्थानांत रेडिओच्या परवान्यांची २,०२,८३४ असलेली संख्या ऑक्टोबर १९४६ मध्यें २,२५,५८४ इतकी झालेली आहे. ऑक्टोबर महिन्यांत २०,७४९ परवाने देण्यांत आले त्यांतील ८,०३६ परवाने अगदीं नवीन आहेत.

**सिलोनचे सोन्याच्या आयातीचे प्रयत्न**—सिलोन सरकारनें अमेरिका व हिंदुस्थान ह्यांचेकडून सोन्याच्या आयातीबद्दल केलेल्या प्रयत्नांस अद्याप यश आलेलें नाहीं. सिलोनच्या दक्षिण हिंदुस्थानाशीं ह्याबाबत वाटाघाटी चालू असून अजून त्यांतून कांहींच निष्पन्न झालेलें नाहीं. फक्त धंदेवाईक व्यापाऱ्यांकडूनच आयात केली जाईल ह्या अटीवर हिंदुस्थान सरकारनें दरवर्षी १ लक्ष २० हजार तोळे चांदी सिलोनला देण्याचें ठरविलें आहे.

**पॅरिसमध्यें लहान मुलांचा काळाबाजार**— आईकडून ६०,००० फ्रँकांना लहान मुलें विकत घेऊन तीं मुलें संभाळण्याची इच्छा असणारांना विकण्याच्या वाढत्या काळ्याबाजाराला आळा घालण्याची मोहीम पॅरिसमधील मुलकी अधिकारी करीत आहेत.

**टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे ग्रामीण पुनर्रचनेचे प्रयत्न**—सुप्रसिद्ध व्यापारी श्री. मुरलीधर चतुर्भुज लोया यांनीं आपल्या आजोबांच्या स्मरणार्थ पुणें टिळक महाराष्ट्र विद्यापीठामार्फत ग्रामीण पुनर्रचनेस उत्तेजन देण्याकरितां लवकरच स्थापन होणाऱ्या संस्थेस १ लाख रुपयांची उदार देणगी दिलेली आहे. पुढच्याच वर्षी टिळक विद्यापीठ आपला रौप्यमहोत्सव साजरा करणार आहे.

**भुसावळ-इंदूर-तराना रेल्वेमार्ग**—भुसावळहून खरगांव व इंदूर मार्गें तराना ह्या नियोजित रेल्वेमार्गाची पहाणी मंजूर झाली आहे. हा मार्ग होळकर संस्थानांतील नेमाड जिल्ह्याचे बरोबर मधून जाणार आहे. हा मार्ग १६० मैल लांब असून त्यामुळें इंदूर व मुंबई ह्यांतील अंतर कांहीं प्रमाणांत कमी होईल. त्याचप्रमाणें मध्यप्रांतांतील कोळशाच्या खाणींचें अंतरही कमी होऊन सध्याचा कोळशाच्या वहातुकीमुळें होणारा १० टक्के तोटा येणार नाहीं.

**खेडेगांवांच्या तोंडाचे रस्ते**—मुंबई प्रांतांतील खेडेगांवांच्या तोंडाच्या रस्त्यांसाठी मुंबई सरकारनें आणखी १,५०,००० रुपये मंजूर केले आहेत. मध्यभागाच्या वाटणीस त्यांतील ६५,००० रुपये येतील.

**उद्घाटनप्रसंगीं चांदीची किल्ली कुलुपांत अडकली**—ऑक्सफर्ड येथील एका ग्रंथालयाच्या इमारतीचें उद्घाटन ग्रेटब्रिटनच्या राजाच्या हस्तें नुकतेंच व्हावयाचें होतें. कुलूप उघडण्यासाठीं तयार केलेली चांदीची किल्ली कुलुपांतच मोडली व ऑक्सफर्ड विश्वविद्यालयाच्या अधिकाऱ्यांना दरवाजा आंतून उघडावा लागला.

**ब्रिटनला अमेरिकेंत खर्चासाठी डॉलर्स कमी पडणार !** अमेरिकेनें ग्रेट-ब्रिटनला मोठें कर्ज मंजूर केलें आहे, त्यापैकीं ग्रेट ब्रिटन दरमहा १० कोटि डालर्स उचलीत आहे. ग्रेट ब्रिटननें आतांपर्यंत १०० कोटि डॉलर्स खर्चले आहेत. ह्या पद्धतीनें तीन वर्षांत सबंद कर्जाची रक्कम संपून जाईल. वास्तविक, पांच वर्षेपर्यंत खर्चण्यास अमेरिकेनें दिलेलें कर्ज पुरेल, अशी मूळ अपेक्षा होती. अमेरिकन गव्हावरील कंट्रोल दूर केल्यामुळें त्याची किंमत भरमसाट वाढली आहे आणि परदेशांच्या मागणीनें त्यांत भरच घातली आहे. ब्रिटिश सरकारला ह्या घटनेमुळें थोडी चिंता वाटूं लागली आहे.

**द. हिंदुस्थानांतील अन्नपरिस्थिती**—दक्षिण हिंदुस्थानांतील अन्नपरिस्थितीचा गंभीरपणा कमी झाला आहे, असें रिजनल फूड कमिशनर, दि. ब. मेनन, ह्यांनीं सांगितलें. नुकत्याच पडलेल्या पावसानें विशेष नुकसानी केलेली नाहीं.

**वॉशिंग्टन-मुंबई प्रवास ४९ तासांत**—अमेरिका-पॅलेस्टाइन-हिंदुस्थान वैमानिक वहातुक येत्या जानेवारींत सुरू होईल. ह्या ९,००० मैलांच्या प्रवासास ४२ तास, ४० मिनिटें लागतील. त्यांत वाटेंत न्यूयॉर्क, लिड्डा (पॅलेस्टाईन) धाग्न (सौदी अरेबिया) व कराची येथें विमान कांहीं वेळ थांबेल. त्याचे १० तासहि समाविष्ट आहेत.

**इं. फंडाकडे कळविलेल्या चलनाच्या किंमती**—इंटर नॅशनल मॉनेटरी फंडाकडे त्याच्या २९ पैकीं २१ सभासद राष्ट्रांनीं आपल्या चलनाच्या सम ('पार') किंमती कळविल्या आहेत. ८ सभासद राष्ट्रांनीं मुदत मागून घेतली आहे. १ मार्च, १९४७ पासून फंडाच्या कार्यास प्रारंभ होईल. कांहीं राष्ट्रांच्या चलनाच्या सम किंमती खालीं दिल्या आहेत. एका अमेरिकन डॉलर बरोबर किती चलन, हें दर्शविणारे ते आकडे आहेत.

| | |
|---|---|
| ग्रे. ब्रिटन | ४ शि. ११·५५३ पेन्स |
| कॅनडा | १·००००० डॉलर |
| हिंदुस्थान | ३·३०८५२ रुपये |
| इजिप्त | ०·२४१९५५ पौंड |
| फ्रान्स | ११९·१०७ फ्रँक |
| बेल्जम | ४३·८२६५ फ्रँक |
| नेदरलंडस | २·६५२८५ गिल्डर |


## ऑर्गनायझर्स पाहिजेत

प्रॉव्हिन्शियल इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्हज असोसिएशन, ९, बेंक हाऊस लेन, फोर्ट, मुंबईसाठी जिल्हानिहाय ऑर्गनायझर्स नेमणें आहेत. पगार महागाई भत्त्यासह प्रथम ७५ रुपये दिला जाईल. परंतु त्यांत लायकीप्रमाणें फरक असूं शकेल, व ती मर्यादा १५० रु. पर्यंत सुद्धां राहील. उमेदवार विशेषतः खेड्यांतून काम करण्याची हौस असणारे व राष्ट्रीय संस्थांतून शिक्षण घेतलेले आणि सामाजिक सेवेसाठी तत्परतां बाळगणारे असावेत. याशिवाय खेड्यांतील उद्योगधंद्यांची माहिती व त्या त्या समाजांत पूर्णपणें मिसळणारे असे जे असतील, त्यांच्याकडे विशेष लक्ष दिलें जाईल. पगाराव्यतिरिक्त प्रवासखर्चही मिळेल. ज्या त्या जिल्ह्यांतील रहिवाशांनीं अर्ज पाठवावेत. अर्जांत वय, शिक्षण, कामाचे पूर्व अनुभव व किमान पगार ही माहिती अवश्य पाठवावी.

अर्ज वरील पत्त्यावर शक्य तितक्या लवकर पाठवावेत.

चिटणीस


## "अर्था"ची वार्षिक वर्गणी

जानेवारी, १९४७ पासून "अर्था"ची वार्षिक वर्गणी ६ रुपये करणें भाग पडलें आहे. तरी नव्या-जुन्या वर्गणीदारांनीं ह्यापुढें वर्गणी पाठवितांना ह्याची नोंद घ्यावी.

—व्यवस्थापक, "अर्थ", दुर्गाधिवास, पुणें ४.


आमचें चालू उत्पादन भाग ३

## —प्रकाश पात्रें—

चांदीचा टिकाऊ थर दिलेलीं नित्योपयोगी रौप्य पात्रें.

● ताट ● लोटी ● भांडें

◆ विड्याच्या पानाचा डबा

उद्यम मंडळ—२८२ शुक्रवार पेठ, पुणें

एजन्सीज देणें आहेत.

## अखंड हिंदुस्थान

हिंदुस्थान हा एक देश नसून त्याचे हिंदुस्थान व पाकिस्तान असे दोन खंड पाडले पाहिजेत आणि हिंदूंचें एक व मुसलमानांचें एक अशीं दोन स्वतंत्र राज्यें निर्माण केलीं पाहिजेत, असा मुस्लिम लीगनें जोरानें प्रचार चालविला आहे. हिंदुस्थानचें अखंडत्व ब्रिटिशांनाहि पटलें असलें तरी आजच्या परिस्थितींत ब्रिटिश सरकार त्याबद्दल आग्रह धरण्यास तयार नाहीं, असें दिसतें. हिंदूंच्या नित्यनैमित्तिक धार्मिक कृत्यांची हजारों वर्षांपूर्वीपासून चालत आलेली परंपरा ह्याबाबत काय सांगते, ह्याचा विचार "पुरुषार्थ" मासिकाच्या डिसेंबर १९४६ च्या अंकांत करण्यांत आला आहे. हिंदुस्थानास इतिहासपूर्व कालांतहि भारत हें नांव होतें, असें दाखवून इतिहासकालांतील भारताची व्याप्ती अनेक सूत्रांच्या व श्लोकांच्या आधारें संपादकांनीं सिद्ध केली आहे. चार धामें, बारा ज्योतिर्लिंगें, रामरक्षेंतील अखंड हिंदुस्थानाची कल्पना, कलशपूजन, वैदिक नद्या, इत्यादीवरून हिंदुस्थानच्या विस्तृत मर्यादांची कल्पना येण्याजोगी आहे. "हिंदुस्थान अखंड न राहिला, तर हिंदूंचे धर्मविधी, संस्कार, व्रतें, वैकल्यें, पूजाअर्चा, पुण्याहवाचनें, कर्माङ्ग अभिषेक, हीं सांगतापूर्वक होणें शक्य नाहीं" हें पटविण्याचा लेखाचा उद्देश आहे.

## प्राप्तीवरील कराची अर्ज-अपीलें कोणाकडे पाठवावीं!

प्राप्तीवरील कराचीं व जादा नफ्यावरील कराचीं अपिलें व त्या कायद्याखालील अन्य अर्ज 'रजिस्ट्रार ऑफ द इन्कम टॅक्स अपेलेट ट्रिब्यूनल' बॉम्बे, अथवा असिस्टंट रजिस्ट्रार, मुंबई, पाटणा, अलाहाबाद किंवा मद्रास यांजकडे द्यावेत. कोणत्याही प्रांतांतील कर-आकारणी-संबंधीं प्रश्न असला तरी वरीलपैकीं कोणत्याही कचेरीकडे तत्संबंधी अर्ज अपिलें पाठवितां येतील. सदर अर्ज व अपिलें वरील अधिकाऱ्यापुढें समक्ष हजर करावींत अथवा रजिस्टर्ड पोष्टानें पाठवावींत किंवा सदर अधिकारी अनुपस्थित असतील तेव्हां त्यांच्या कचेरींतील सुपरिंटेंडेंट अथवा हेडक्लार्क यांचेजवळ द्यावींत असें सरकारकडून नुकतेच जाहीर करण्यांत आलें आहे.

## कापडाच्या रेशनमध्यें कपात ?


मुंबई व अहमदाबाद येथील दंग्याच्या परिस्थितीमुळें कापडाचें उत्पादन बरेंच घटलें आहे. अहमदाबाद येथील मासिक उत्पादन ५२,००० गांठी इतकें असतें, तें ३९,००० गांठींवर आलें आहे. मुंबईच्या गिरण्यांचें उत्पादनहि २५% घटलें आहे. कोळशाचा अपुरा पुरवठा हेंहि उत्पादन कमी होण्याचें एक कारण आहे. परदेशी कापडाची आयातहि अपेक्षेप्रमाणें झालेली नाहीं. ह्या सर्व गोष्टींचा परिणाम कापडाचे रेशनवर होणार, असा रंग दिसतो. हिंदुस्थान सरकारनें प्रांतिक सरकारांच्या प्रतिनिधींशीं ह्या प्रश्नावर चर्चा करून, येत्या जानेवारीपासून रेशनमध्यें एक शष्ठमांश कपात करून तें पूर्वींच्या पांच शष्ठमांशाइतकें ठेवण्याचें योजिलें आहे, असें समजतें.

**दि असोसिएटेड सिमेंट कंपनीज लि.**—वरील कंपनीनें ३१ जुलै १९४६ अखेर संपलेल्या वर्षीं ५ कोटि, ७९ लक्ष रुपयांचें सिमेंट विकलें. घसारा काढून व कराची तरतूद करून निवळ नफा ७२ लक्ष, २५ हजार रुपये उरला. १०० रुपयांच्या प्रत्येक शेअरला ७ रु. डिव्हिडंड मिळणार आहे. "सरकारी मागणी बरीच कमी झाली असल्याकारणानें, जनतेला सिमेंट आतां सहजीं मिळूं शकतें." किंमतीहि उतरल्या आहेत. सिमेंट एजन्सीज लि. ह्या मॅनेजिंग एजन्सी फर्मला कमिशनचे १४ लक्ष, १६ हजार रु. मिळाले.

**युद्धांतून परतलेल्या सैनिकांची सोय**—अमेरिकन कारखान्यांतील २७,५०,००० कामगारांपैकीं १९% कामगार गेल्या युद्धांतील निवृत्त सैनिक आहेत. त्यांच्यापैकीं ६०% कामगारांना दर आठवड्यास सुमारें १५० रुपये वेतन मिळत आहे.

**सर विश्वेश्वर अय्या परत आले.**—ऑल इंडिया मॅन्युफॅक्चरर्स ऑर्गनायझेशननें पाश्चिमात्य देशांकडे पाठविलेल्या शिष्टमंडळाचे नेते सर मोक्षगुंडम विश्वेश्वर अय्या हे गेल्या आठवड्यांत मुंबईस येऊन दाखल झाले. शिष्टमंडळाचे चार सभासद मागाहून येत आहेत.


पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८




साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितीमुळें वाहतुक व पुरवठा याबाबतचीं नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादन-शक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी





# सारस्वत
## को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[स्थापना १९१८] सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई
टे. नं. ३१६७५ ३०–११–१९४६

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ४,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. ३,६५,०४० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स् ... | रु. २,०३,००० |
| ठेवी ... | रु. ६५,७८,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ७१,००,००० |

स्पेशल सेव्हिंग्ज डिपॉझिट स्कीम
व्याज : २ टक्के
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.
—विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा—

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्.
चेअरमन

एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्.
सेक्रेटरी

सब–ऑफिस : दादर, (बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर)



मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या
केंद्रस्थानीं असलेली
## शेतकऱ्यांची प्रांतिक बँक
म्हणजेच
## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को–ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड
(सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली)
स्थापना १९११

—मुख्य कचेरी—
सर विठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग
९, बँक हाऊस लेन, कोट, मुंबई.
शाखा ५०

खेळतें भांडवल रु. ७,३१,००,०००

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी
स्वीकारल्या जातात
आणि
इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा
व्यवहार केला जातो.
—पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिसकडे लिहा—

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर



आंध्र खादीचे
(म्हणजेच ४० नंबराच्या वरच्या
नंबराच्या सुताच्या खादीचे)
—एकमेव विक्रेते—

## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २



तयार कपड्यांचे
व्यापारी

## महिंद्रकर ब्रदर्स

गिरगांव, मुंबई नं. ४
व बुधवार चौक, पुणें



लोकांच्या विश्वासास पात्र झालेलें

## दी डेक्कन इंजिनिअरिंग, लिमिटेड.

माधवनगर (बुधगांव) एम्. एस्. एम्. रेल्वे

नांगर —यांचे— चरक

किसान नं. १०१ (सहा ते आठ बैली) — विश्वास (चार बैली)
किसान नं. १०२ (चार ते सहा बैली) — वासुदेव (दोन बैली)
किसान नं. १०५ (दोन ते चार बैली) — राजा (एक बैली)

'मधुकर' (सात फण्याचे) कोळपें (दोन बैली)

एजंटस्, स्टॉकिस्टस् नेमणें आहेत

# मुंबई शेअर बाजार

(वि. म. लिमये आणि मं. यांजकडून)

व्याज-वजा
शिंदिया स्टीम रु. १-४-० दि. २०-१-४७
बॉम्बे बर्मा रु. १० दि. ९-१-४७

व्याज-वजा
बेलापूर रु. ९ दि. १५-१-४७

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार १७।१२।४६ | बुधवार १८।१२।४६ | गुरुवार १९।१२।४६ | शुक्रवार २०।१२।४६ | सोमवार २३।१२।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६७५; १९८० | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २६९५ | २६७१—४ | २७२२—८ | २७००—० | |
| ४८०; ३७२ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४१० | ४८६ | ४९४—८ | ४९२—० | |
| २२२-८; १७६२-१२ | २५-०-० † | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २५६५ | २५६२—८ | २६५०—० | २६५०—० | |
| ७०२; ५६६ | १२-०-० † | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ८५४ | ८४८—० | ८६५—० | ८६७—० | बाजार बंद |
| ६६८; ५०७ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ६९२ | ६८२—० | ६९४—० | ६९२—० | |
| ४४३-८; ३६० | ७-०-० S | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | ४०१ | ३९८ | ४०३ | ४०२—० | |
| ३४२-०; २७५ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ३६७ | ३५८ | ३६८ | ३६६—० | |
| ३३५; २८३-८ | ६-०-० † | ऑक्टो.-एप्रिल | गॅकाक | १०० | ३५४ | ३४६—८ | ३५४ | ३५० | |
| ३३७; २४३ | ९-०-० S | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ४०४—८ | ३९८ | ४१० | ४१० | |
| ५; ३-११-० | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ५—०—० | ४—१५—६ | ४-१५-६ | ५—०—९ | |
| १७-१०; १३-७-० | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १९—४ | १८—१५ | १९—८ | १९—६ | |
| ३-१०; २-९ | ०-३-० | मे | „ डिफर्डस् | १ | ४—३—६ | ४—२—६ | ४—३—६ | ४—४—६ | |
| ७९०; ६४५ | ४१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ७६२—८ | ७६० | ७७० | ७६० | |
| २४३-८; २०६-८ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २२८ | २२६ | २२६ | २२५ | |
| २५६; २१३-८ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | ३४१ | ३३३ | ३३६ | ३३६ | |
| ५९२-८; ५१०-० | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ६९० | ६८५ | ७०२—८ | ६९५ | |
| ४३-७; ३०-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ४५—८ | ४५—४ | ४६—४ | ४६—० | |

शुक्रवार दि. २०-१२-४६ चे भाव

**बँका**

| | |
|---|---|
| बरोडा | १८१ |
| सेंट्रल | १२०—८ |
| इंडिया | २४७—८ |
| इंपी० | २७१२—८ |
| | ६७५ |
| रिझर्व्ह | १४८ |

**वीज कंपन्या**

| | |
|---|---|
| आंध्र व्हॅली | १८४५—० |
| बॉम्बे ट्रॅम | १२५—८ |
| टाटा हायड्रो | २०९ |
| टाटा पॉवर | १९३० |

**संकीर्ण**

| | |
|---|---|
| अलकॉक | ५८० |
| बॉंबे स्टीम | ७२७—८ |
| न्यू इंडिया | ९९—८ |
| शिवराजपुर | ४८—० |
| टाटा केमिकल | १८—२ |
| टाटा ऑईल | १०० |

दि. २४-१२-४६ ते १-१-४७ अन्ते बाजार बंद आहे.

## संयुक्त राष्ट्रसंघाच्या बैठकींत काय ठरलें ?

संयुक्त राष्ट्रांच्या जनरल असेंब्लीची अमेरिकेंतील बैठक नुकतीच संपली. तिनें काय कामगिरी केली, त्याचा आढावा घेतला तर खालील गोष्टी नजरेसमोर येतात:—

(१) आंतरराष्ट्रीय निर्वासित संस्थेची स्थापना.

(२) संयुक्त राष्ट्रांच्या मुख्य कचेरीसाठी न्यू यॉर्क शहरांत जागेची निवड.

(३) सयामच्या सभासदत्वास मान्यता.

(४) संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक व सामाजिक कौन्सिलच्या विषय-पत्रिकेसाठी प्रश्न पाठविण्यासाठी वर्ल्ड फेडरेशन ऑफ ट्रेड यूनियन्स व इतर तीन बिन-सरकारी संस्था ह्यांस अधिकारदान.

(५) चार विशिष्ट संस्थांचा संयुक्त राष्ट्रांशीं संबंध जोडणाऱ्या करारास मान्यता.

(६) स्वायत्त नसलेल्या प्रदेशांची व्यवस्था पहाणाऱ्या राष्ट्रांनीं पाठविलेल्या माहितीची छाननी करण्यासांठी १६ राष्ट्रांच्या समितीची नेमणूक.

(७) सर्व समासद राष्ट्रांनीं जागतिक आरोग्य संघटनेच्या घटनेस त्वरित मान्यता द्यावी अशी शिफारस.

जर्मन व ऑस्ट्रियन तहनाम्यांचा अवघड प्रश्न अद्याप सुटावयाचा आहे.

**जर्मन तहनाम्यांची मॉस्कोमध्यें चर्चा**—जर्मनीशीं करावयाच्या तहनाम्यांची चर्चा परराष्ट्र मंत्र्यांचें कौन्सिल मॉस्कोमध्यें बसून करणार आहे. ह्या सभेस ता. १० मार्च रोजीं प्रारंभ होईल.

**स्टॉक एक्सचेंजला सुटी**—सोमवार, ता. २३ डिसेंबर १९४६ ते बुधवार ता. १ जानेवारी १९४७ अखेर नाताळानिमित्त स्टॉक एक्सचेंज बंद राहील.


# दि रत्नाकर बँक लिमिटेड.

ऑफिसें:—१ कोल्हापूर, २ शाहुपुरी, ३ सांगली, ४ मिरज, ५ जयसिंगपूर.

चेअरमनः—नामदार बी. बी. पाटील, बी. ए, एलएल. बी., डेव्हलपमेंट मिनिस्टर, सांगली स्टेट.

| | रु. |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ६,२७,१०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ३,१३,९०० |
| खेळतें भांडवल अंदाजें | ३५,००,००० |

—: यथावत् बँकिंग व्यवहार केले जातात. :—

## युद्धपूर्व व युद्धकालीन जपान

लेखकः—श्री. विनायक श्रीधर सुपनेकर

(२)

आधुनिक जपानचा प्रारंभ आत्मसंरक्षणापासून झाला. अडीचशें वर्षें तो आपल्या देशांत एकांतवासानें राहिला. पुढें १८५३ मध्यें कमोडोर पेरी यांनीं त्याला प्रथम धक्का दिला. मग जपानला कळून चुकलें कीं, आपणाजवळ संरक्षण दृष्टीनें भरपूर साहित्यसामुग्री नाहीं. म्हणून त्यानें तयारी करण्याला सुरवात केली. त्यानें आत्मसंरक्षणाकरितां आपलें लष्करी सामर्थ्य वाढविलें. पुढें रशियाचा व चीनचा त्रास होऊं लागला. मग देशाभोंवतीं हल्ला न होण्याची प्रतिबंधक तयारी केली.

सारांश, प्रारंभीं आत्मसंरक्षणाचें धोरण होतें, नंतर प्रतिबंधक इलाज म्हणून कांहीं गोष्टी केल्या; पुढें सामर्थ्याचा आत्मविश्वास वाढला त्याबरोबर आक्रमणाचें धोरण स्वीकारलें. अशा रीतीनें जपानच्या परराष्ट्रीय धोरणांत द्रुतगतीनें प्रगति झाली.

**चालू युद्ध आणि त्यामध्यें जपान्यांचा हिंदी लोकांना आलेला अनुभवः**—१९४१ च्या डिसेंबर महिन्याच्या ८ तारखेस लढाई सुरू झाली. लढाईच्या सुरवातीला जपाननें केलेल्या अनपेक्षित आक्रमणामुळें दोस्तांचें धाबें दणाणलें. त्यांतच इंग्रजांच्या गुलामगिरींत खितपत पडलेल्या ब्रह्मदेश—मलायांतील हिंदी लोकांना शरणागत हिंदुस्थान—नाविकदलाकडून ताब्यांत घेतलें. अर्थातच हिंदुस्थानवर होणाऱ्या हल्ल्याचें दृष्टीनें त्यांना पुष्कळच माहिती मिळाली. स्वातंत्र्याकरितां उत्सुक झालेली जनता त्यांच्यापासून साह्य मिळेल काय याची प्रतीक्षा करीत होती. अशावेळीं सर्व जनता आणि सैन्य एकदम सर्व इंग्रजी साम्राज्यशाही उलटून टाकण्याइतकी प्रचंड तयारी पाहून, अर्थात् हें टाळण्यासाठी जपानविरुद्ध बऱ्यावाईट अफवा उठवून तिटकारा उत्पन्न करणें हा एकमेव मार्ग होता; आणि तो मार्ग दोस्तांनीं यशस्वीपणें अवलंबिला.

पण जपानी लोकांनीं हिंदी स्वातंत्र्य चळवळीविषयीं दर्शविलेली सहानुभूति आणि हिंदी नागरिकांना वेळोवेळीं केलेली मदत ही पुष्कळच वरच्या दर्जाची ठरेल. राजकारणांतील डावपेंच तितकेसे येत नसल्यामुळें त्यांना त्याचा देखावा करतां आला नाहीं. शिवाय सामुग्रीची कमतरता आणि अनपेक्षित अडचणी, ह्यामुळें फार मोठी मदत करतां आली नाहीं. तथापि परिस्थितीनुसार त्यांनीं पुष्कळ साह्य केलें आहे. प्रत्यक्ष लढाईचे प्रसंगीं ते हिंदी लोकांचे खांद्यास खांदा लावून लढले. जेथें ऐन वेळीं स्वतःलाच दारूगोळा आणि अन्न याची आबाडीवर टंचाई पडली तेथें आम्हाला कशी व कितीशी मदत करणार ?

**जपानचा लढाईमधील पराभवः**—शेवटीं जपानचा पराजय झाला, उद्योगकेंद्रें नष्ट झालीं, लोकांचे आतोनात हाल होत आहेत. ते आतां निःशस्त्र बनले आहेत तरी पण अंगचे गुण आणि आंतरराष्ट्रीय परिस्थिति ह्यांचा विचार केल्यास तें राष्ट्र कितपत गुलामगिरींत राहील याची जबरदस्त शंका वाटते. (संपूर्ण)


**श्री. किर्लोस्करांचें जर्मनीस प्रयाण**—किर्लोस्कर बंधु लि. चे जनरल मॅनेजर श्री. शंतनुराव किर्लोस्कर हे जर्मनीकडे नुकतेच रवाना झाले. तेथील बॅम्बर मशीन टूल यंत्रसामुग्री पहाण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें पाठवलेल्या मंडळाचे ते एक सदस्य आहेत. हिंदुस्थानाच्या नुकसानभरपाईदाखल ही यंत्रसामुग्री या देशास मिळावयाची आहे.


शेअर्स विकणें आहेतः—
गोवर्धन डेअरी फार्म्स लि.,
गोवर्धनवाडी, पुणें १.
















पुणें चीफ एजंटः—
न्यू दत्त एजन्सी,
१००, रविवार पेठ, मोती चौक, पु





हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३, शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.